## <u>प्रेस नोट</u>

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आधुनिक भारताच्या प्रगतीचा पाया - मुख्य अभियंता शिवप्रसाद बागडी

### — –पीएमआरडीए' मुख्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जयंतीनिमित्त अभिवादन

पुणे/आकुर्डी : "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वावर आधारित असून, ते आधुनिक भारताच्या सर्वांगीण प्रगतीचा खऱ्या अर्थाने पाया आहेत. शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्यायाच्या माध्यमातून त्यांनी शोषित व वंचितांना सन्मानाने जगण्याची दिशा दाखवली. त्यांचे हे विचार आजही देशाला विकसित आणि एकात्म बनवण्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहेत," असे प्रतिपादन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) मुख्य अभियंता (प्रभारी) शिवप्रसाद बागडी यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'पीएमआरडीए'च्या आकुर्डी येथील मुख्यालयात मंगळवारी (दि. १४) विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात शिवप्रसाद बागडी बोलत होते. प्रारंभी प्राधिकरणाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी बोलताना बागडी म्हणाले की, बाबासाहेबांचे विचार केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून ते भविष्यातील सशक्त भारताची दिशा निश्चित करणारे आहेत. समता आणि संविधान या तत्त्वांवर आधारलेली त्यांची राष्ट्रदृष्टी आजही देशाच्या उन्नतीचा भक्कम पाया ठरते. आज भारत ज्या आत्मविश्वासाने महासत्तेकडे वाटचाल करत आहे, त्या प्रवासाची बीजे डॉ. आंबेडकरांनीच रोवली होती, हे निर्विवाद सत्य आहे.

या कार्यक्रमाला 'पीएमआरडीए'च्या सहआयुक्त (प्रशासन) रूपाली आवले-डंबे, कार्यकारी अभियंता वसंत नाईक, शिवकुमार कुपल, उपअभियंता प्रशांत जोशी, कनिष्ठ अभियंता जितेंद्र पगार, प्रशासन विभागाचे कक्ष अधिकारी विशाल ताठे, महानगर आयुक्तांचे स्वीय सहाय्यक स्वप्नील बुलबुले, माहिती व जनसंपर्क अधिकारी पुरुषोत्तम सांगळे, वरिष्ठ लिपीक पांडुरंग मधुरकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे औचित्य साधून उपअभियंता प्रशांत जोशी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारे अभिवाचन केले.

----

**पुरूषोत्तम सांगळे**

माहिती व जनसंपर्क अधिकारी

पीएमआरडीए, पुणे